| Roll No. | | | | | | | | | | | | Serial No. of Q. C. A. B. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 50 + 26 = 76 ]
Total No. of Questions : 50 + 26 = 76 ]

[ ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 16
[ Total No. of Printed Pages : 16

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 08-M** ವಿಷಯ : **ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ — ಮರಾಠಿ**

**Code No. : 08-M Subject : First Language — MARATHI**

ದಿನಾಂಕ : 08. 06. 2009 ] [ Date : 08. 06. 2009

ಸಮಯ : ಬೆಳಿಗ್ಗೆ 10-30 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 1-30 ರವರೆಗೆ ] [ Time : 10-30 A.M. to 1-30 P.M.

ಪರಮಾವಧಿ ಅಂಕಗಳು : 125 ] [ Max. Marks : 125

**FOR OFFICE USE ONLY**

**PART – A**

| Q. No. | Marks | Q. No. | Marks | Q. No. | Marks | Q. No. | Marks | Q. No. | Marks | Q. No. | Marks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | | 10. | | 19. | | 28. | | 37. | | 46. | |
| 2. | | 11. | | 20. | | 29. | | 38. | | 47. | |
| 3. | | 12. | | 21. | | 30. | | 39. | | 48. | |
| 4. | | 13. | | 22. | | 31. | | 40. | | 49. | |
| 5. | | 14. | | 23. | | 32. | | 41. | | 50. | |
| 6. | | 15. | | 24. | | 33. | | 42. | | × | |
| 7. | | 16. | | 25. | | 34. | | 43. | | × | |
| 8. | | 17. | | 26. | | 35. | | 44. | | × | |
| 9. | | 18. | | 27. | | 36. | | 45. | | × | |

*Total Marks of Part – **A***

**PART – B**

| Q. No. | Marks | Q. No. | Marks | Q. No. | Marks | Q. No. | Marks | Q. No. | Marks | Q. No. | Marks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 51. | | 56. | | 61. | | 66. | | 71. | | 76. | |
| 52. | | 57. | | 62. | | 67. | | 72. | | × | |
| 53. | | 58. | | 63. | | 68. | | 73. | | × | |
| 54. | | 59. | | 64. | | 69. | | 74. | | × | |
| 55. | | 60. | | 65. | | 70. | | 75. | | × | |

*Total Marks of Part – **B***

| **Total Marks in words** | | | **Grand Total** | |
|---|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| 1. ✓ | | ✓ | ✓ |
| 2. ✓ | | | |
| *Signature of Evaluators* | *Registration No.* | *Signature of the Deputy Chief* | *Signature of the Room Invigilator* |

[ Turn over

**सामान्य सूचना :**

i) प्रश्न व उत्तरपत्रिका एकत्रित असून, त्यात दोन विभाग आहेत, **Part - A** व **Part - B**.

ii) **Part - A** मध्ये 50 व **Part - B** मध्ये 26 प्रश्न आहेत.

iii) प्रश्नांची उत्तरे लिहिण्यासाठी पुस्तिकेमध्येच जागा दिलेली आहे.

iv) **Part - A** मध्ये दिलेल्या सूचना वाचून योग्य पर्याय क्रमांकासहित दिलेल्या जागामध्ये लिहा.

v) **Part - B** मध्ये प्रत्येक उत्तरासाठी पुरेशी जागा दिलेली आहे. दिलेल्या जागामध्ये प्रश्नांची उत्तरे लिहावीत.

## PART - A

प्रत्येक प्रश्नाला किंवा अपूर्ण वाक्यांशाला चार पर्यायी उत्तरे दिली आहेत. त्यापैकी एकच बरोबर पर्यायी उत्तर निवडून खाली दिलेल्या रिकाम्या जागेत लिहा : $50 \times 1 = 50$

1. 'वाग्विहार' या संधीयुक्त शब्दाचा विग्रह असा होतो —

(A) वाक् + विहार (B) वाग्वी + हार

(C) वाग + विहार (D) वाक्वी + हार.

उत्तर : ______

2. संबोधन विभक्तीचे प्रत्यय कोणते ?

(A) स, ला, ते (B) नो

(C) चा, ची, चे (D) ऊन, हून.

उत्तर : ______

3. कर्त्याची प्रथमा व कर्माची प्रथमा किंवा द्वितीया विभक्ती असणारा प्रयोग

(A) कर्मणी (B) भावे

(C) संकर (D) कर्तरी.

उत्तर : ______

4. 'तो शिक्षणासाठी परदेशी जाईल.' — काळ ओळखा.

(A) भविष्य काळ (B) वर्तमान काळ

(C) रीति भूत काळ (D) भूत काळ.

उत्तर : ______

5. मागून येऊन मोठेपणा मिरवणे अशा आशयाची एक म्हण

(A) वरचढ होणे (B) गर्व करणे

(C) कानामागून येऊन तिखट होणे (D) तोरा मिरवणे.

उत्तर : ______

6. कविता म्हणताना थांबण्याच्या जागेला काय म्हणतात ?

(A) लघु (B) यति

(C) गुरू (D) वृत्त.

उत्तर : ______

7. वाईट आचरण करणारा – शब्दसमुहास एक शब्द द्या.

(A) अत्याचारी (B) दुराचारी

(C) अविचारी (D) मागासलेला.

उत्तर : ______

8. खालील शब्दातील गुण विशेषण कोणते ?

(A) दहा लिटर दूध (B) अर्धा मीटर कापड

(C) कडू कारले (D) पुष्कळ धान्य.

उत्तर : ______

9. 'ऋण' या शब्दाचा समानार्थी शब्द

(A) उपकार (B) परोपकार

(C) सदाचार (D) अपकार.

उत्तर : ______

10. 'कीर्ती' या शब्दाचा समानार्थी शब्द

(A) अपकिर्ती (B) अकिर्ती

(C) सुकिर्ती (D) अलौकिक.

उत्तर : ______

11. खालील शब्दातील तद्‌भव शब्द कोणता ?

(A) पर्ण (B) गाव

(C) दूग्ध (D) पुष्प.

उत्तर : ______

12. खालील वाक्यातील विधानार्थी वाक्य कोणते ?

(A) हे दृश्य सुंदर नाही का ? (B) वा ! केवढे हे सुंदर दृश्य.

(C) हे दृश्य फार सुंदर आहे. (D) हे दृश्य सुंदर नाही असे कोण म्हणेल.

उत्तर : ______

13. हिरा कोणत्या जातीची होती ?

(A) भिल्ल (B) बेरड

(C) आदिवासी (D) कैकाडी.

उत्तर : ______

14. मव्हळ म्हणजे काय ?

(A) मवाळ (B) मशाल

(C) टहाळ (D) मधमाशांचे पोळे.

उत्तर : ______

15. 'सत्कार' ही कथा कोणत्या संग्रहातून घेतली आहे ?

(A) शांते तू जिंकलीस (B) जिद्द

(C) साक्षीदार (D) सोन्या.

उत्तर : ______

16. 'एक गाव एक पाणवठा' या पाठाचे मूल्य

(A) ज्ञानलालसा (B) अस्पृश्यता निवारण

(C) प्रेम (D) जिज्ञासा.

उत्तर : ____________________

17. झेंडे या पक्षाचे होते —

(A) रिपब्लिकन (B) काँग्रेस

(C) जनता (D) समाजवादी.

उत्तर : ____________________

18. हल्ल्याची लगोलग माहिती पसरविण्याचे साधन म्हणजे

(A) बुरूजांची साखळी (B) किल्ले

(C) शिपाई (D) चीनची भिंत.

उत्तर : ____________________

19. शाळा सुरू करण्यासाठी कुणी मदत केली ?

(A) लेखकाने (B) शेख मास्तरांनी

(C) दलित शिक्षण अधिकाऱ्याने (D) कुळवाड्यांनी.

उत्तर : ____________________

20. 'जिद्द' हा पाठ कुणी अनुवादित केला आहे ?

(A) डॉ० राधा जोगळेकर (B) लीना सोहनी

(C) डॉ० प्रतिभा राय (D) डॉ० किरण बेदी.

उत्तर : ____________________

21. यापैकी एक पुस्तक श्रीनिवास कुलकर्णी यांचे नाही —

(A) पाण्याचे पंख (B) सोन्याचा पिंपळ

(C) माती, पंख आणि आकाश (D) डोह.

उत्तर : ____________________

22. चितमपल्ली यांच्या या पुस्तकाला गो० नि० दांडेकर मृण्मयी पुरस्कार मिळाला —

(A) रानवाटा (B) जंगलाचं देणं

(C) रातवा (D) वन्यजीव व्यवस्थापन.

उत्तर : ____________________

23. शारदेची परवशता हा नाट्यउतारा या नाटकातील आहे —

(A) संशय कल्लोळ (B) शापसंभ्रम

(C) झुंझारराव (D) शारदा.

उत्तर : ____________________

24. 'शारदा' या नाटकात कोणता रस आला आहे ?
(A) करूण (B) रौद्र
(C) बिभत्स (D) हास्य.

उत्तर : ____________________

25. विद्याधर पुंडलिक यांचे एक नाटक कोणते ?
(A) देवचाफा (B) टेकडीवरचे पीस
(C) पुष्पांजली (D) माता द्रौपदी.

उत्तर : ____________________

26. मातबर खासे पळो लागले या पाठाचा वाङ्मय प्रकार
(A) प्राचीन गद्य (B) अर्वाचीन गद्य
(C) बखर वाङ्मय (D) ग्रामीण साहित्य.

उत्तर : ____________________

27. विश्वासरावांचा मृत्यू कसा झाला ?
(A) वार्धक्याने (B) गोळा लागून
(C) आजाराने (D) घोड्यावरून पडून.

उत्तर : ____________________

28. आबदुल अलि पळून कुठे गेला ?
(A) घरी (B) राजवाड्यात
(C) नदीतिरास (D) जंगलात.

उत्तर : ____________________

29. बाईसा गोसाव्याचे चरण कशाने स्वच्छ करते ?
(A) दूधाने (B) पदराने
(C) पाण्याने (D) अमृताने.

उत्तर : ____________________

30. 'सायंकाळचा पूजावसर' या पाठाचे लेखक
(A) चक्रधर स्वामी (B) गोविंदप्रभू
(C) भटोबा (D) बाईदेव बास.

उत्तर : ____________________

31. देवाच्या विरहाने आर्त झालेल्या भक्ताच्या अवस्थेचे वर्णन —
(A) विरहिणी (B) अभंग
(C) श्लोक (D) लावणी.

उत्तर : ____________________

32. गलीन कसे निपटावे ?
(A) युद्ध करून (B) लाच देऊन
(C) युक्तीने (D) प्रजेला एक करून.

उत्तर : ____________________

33. समर्थ रामदासांचे आडनाव

(A) ठोसर (B) ठाकर
(C) ठोसरे (D) ठाकरे.

उत्तर : ____________________

34. विपत्काळी धैर्य तर प्रभूपणी

(A) शौर्य (B) मौन
(C) दातृत्व (D) सहिष्णूतता.

उत्तर : ____________________

35. करित्ये बद्ध तूज दामाने या कवितेतील आर्यांचा क्रमांक

(A) 28 ते 34 (B) 34 ते 40
(C) 24 ते 28 (D) 28 ते 30.

उत्तर : ____________________

36. दासगणू यांचे पूर्ण नाव काय ?

(A) दत्तात्रय गणेश सहस्त्रबुद्धे (B) गणेश दत्तात्रेय सहस्त्रबुद्धे
(C) राम गणेश गडकरी (D) गणेश दत्तात्रेय बुद्धे.

उत्तर : ____________________

37. विडंबनकार कुणाला म्हणतात ?

(A) कृ० के० दामले (B) वि० वा० शिरवाडकर
(C) प्र० के० अत्रे (D) रा० ग० गडकरी.

उत्तर : ____________________

38. आम्ही कोण ? या मूळ कवितेचे कवी कोण ?

(A) केशवसुत (B) केशवकुमार
(C) कुसुमाग्रज (D) बालकवी.

उत्तर : ____________________

39. कुसुमाग्रज यांचे पूर्ण नाव

(A) वामन विष्णू शिरवाडकर (B) विष्णू वामन शिरवाडकर
(C) कृष्णाजी केशव दामले (D) प्रह्लाद केशव अत्रे.

उत्तर : ____________________

40. 'ग्रीष्मातल्या सकाळी' ही कविता या संग्रहातील आहे —

(A) स्वप्नजा (B) नीहार
(C) श्रावणमेघ (D) आकाशवेडी.

उत्तर : ____________________

41. यापैकी एक काव्यसंग्रह पद्मा गोळे यांचा नाही —

(A) श्रावणमेघ (B) स्वप्नजा
(C) नीहार (D) विशाखा.

उत्तर : ____________________

42. कोळीण कोणत्या रंगाची साडी नेसली आहे ?

(A) पिवळी (B) हिरवी

(C) लाल (D) अंजिरी.

उत्तर : ____________________

43. आईच्या पायातून भळाभळा रक्त वाहते. कारण

(A) काटा लागतो (B) विंचू चावतो

(C) साप चावतो (D) कुऱ्हाडीचा घाव बसतो.

उत्तर : ____________________

44. आई रानात कशासाठी जात असे ?

(A) गवत आणण्यास (B) मोळी आणण्यास

(C) गुरू चारण्यास (D) पक्षी निरीक्षण करण्यास.

उत्तर : ____________________

45. कृश मोळीवाली पाहिल्यावर कवी काय करतो ?

(A) मोळी विकत घेतो (B) मोळीवालीला हाकलतो

(C) खूप रडतो (D) मोळीवालीची विचारपूस करतो.

उत्तर : ____________________

46. पानाचे हिरवेपण कुणी भिनवून घेतले ?

(A) थेंबाने (B) ढगाने

(C) मातीने (D) पक्षाने.

उत्तर : ____________________

47. बंगल्याला पाऊस काय म्हणाला ?

(A) तू तर निमित्तमात्र (B) असा एकटाच ?

(C) बरं आहे का ? (D) माझ्या मनात असं नव्हतं.

उत्तर : ____________________

48. माणसाचे अभयारण्य या कवितेची मध्यवर्ती कल्पना

(A) अभयारण्याची (B) पक्षी संवर्धनाची

(C) नि:स्वार्थी जगाची (D) स्वातंत्र्याची.

उत्तर : ____________________

49. अभयारण्यातील झोप कशी असेल ?

(A) निर्भय (B) शांत असीम

(C) गाढ (D) अर्धवट.

उत्तर : ____________________

50. दासगणू हे उत्तम .......................... होते.

(A) विडंबनकार (B) चित्रकार

(C) किर्तनकार (D) गायक.

उत्तर : ____________________

## PART - B

खालील प्रश्नांची **दोन-तीन** वाक्यात उत्तरे लिहा.

51. मास्तरांनी लेखकाला कोणकोणते साहित्य आणावयास सांगितले ? 2

52. ''हे काय आणिक ? कुठं ?'' संसदर्भ स्पष्ट करा. 2

53. ''क्षेम मी देईन पांडुरंगी'' ससंदर्भ स्पष्ट करा. 2

54. अलंकार ओळखून लक्षणे लिहा. 2
न हे नयन, पाकळ्या उमलल्या सरोजातील.

55. लोकहितवादींचा परिचय द्या. 2

56. लघुगुरू लेखन करून वृत्त ओळखा : 2

हिरेजडित सुंदरी कनकपंजरीही वसे.

57. ''म्हणजे आजोबा तुम्ही परत नाही येणार ?'' ससंदर्भ स्पष्ट करा. 2

58. खालील सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा : 2

अ) मौनव्रत ब) टोळीयुद्धे.

59. पिटीशन बॉक्समुळे कोणकोणत्या समस्या समजून आल्या ? 2

60. यशोदा कृष्णाला कोणती शिक्षा करते ? का ? 2

61. चीनची भिंत का बांधली गेली ? 2

62. कवी कुसुमाग्रज यांचा परिचय लिहा. 2

63. टाकळीला 'सैनिक टाकळी' असे का म्हणतात ? 2

64. खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. 2
अ) अंगावर शहारे येणे ब) चाट पडणे.

खालील प्रश्नांची **पाच-सहा** वाक्यात उत्तरे लिहा :

65. वटवृक्षावरील पक्षांना पाहुन लेखकाला काय वाटते ? 3

66. कोळीणीचे वर्णन कवयित्रीने कशाप्रकारे केले आहे ? 3

67. दुसऱ्याला मदत न करण्याच्या बाबतीत प्रवीर बाबूंच्या पत्नीची मते काय होती ? 3

68. वामन पंडितानी सत्पुरुषाचे कोणते सहा गुण सांगितले आहेत ? 3

खालील प्रश्नांची **सात-आठ** वाक्यात उत्तरे लिहा.

69. इंग्रजी भाषेमुळे मराठीला निर्माण झालेले धोके कोणते ? 4

70. डॉक्टरांनी देशासमोर कोणती नवपंचशीले मांडली ते सविस्तर लिहा. 4

71. राजा व वनमाला यांचा संवाद तुमच्या शब्दात लिहा. 4

72. शबरी व श्रीरामाच्या भेटीचे वर्णन करा. 4

73. खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा. 4

असा वेडाखुळा ............................................

..................................................................

..................................................................

..................................................................

..................................................................

.................................................. मंजिरीशी ।

74. खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. 5

डॉ० भाभा हे असामान्य गृहस्थ होते. विज्ञानाखेरीज संगीत, चित्रकला, स्थापत्यशास्त्र यात रस घेणारे होते. ते स्वतः उत्तम चित्रकार होते. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रीसर्च आणि भाभा अॅटॉमिक रीसर्च सेंटर या दोन संस्थांच्या इमारती व बागा त्यांच्या सौन्दर्य दृष्टिची साक्ष देतात. आपल्या हाताखाली काम करणाऱ्या लोकाना काम करण्यासाठी उत्तम प्रकारची साधन-सामग्री असावी असा त्यांचा आग्रह होता. त्यानी आपल्या कार्याचा तपशीलवार आराखडा काढला होता आणि या नियोजनाप्रमाणे कार्य होत असल्याचे पाहण्यावर त्यांचा भर होतो.

i) डॉ० भाभाना असामान्य गृहस्थ असे का म्हटले जाते ?
ii) त्यांच्या सौंदर्यदृष्टीची साक्ष देणाऱ्या संस्था कोणत्या ?
iii) हाताखालच्या लोकांच्या बाबतीत डॉ० भाभांचा दृष्टीकोण कोणता होता ?
iv) त्यांच्या कार्यापद्धतीचे कोणते दोन विशेष सांगितले आहेत ?
v) उताऱ्याला योग्य शीर्षक द्या.

75. तुमच्या भावाच्या अपघाताच्यावेळी मदत करणाऱ्या त्याच्या मित्राचे आभार मानणारे पत्र लिहा. 5

**किंवा**

तुमच्या हातून वर्गातील लाकडी साहित्याची मोडतोड झाली आहे. त्याबद्दल मुख्याध्यापकाकडे गुन्हा कबूल करून शिक्षा न करण्याबद्दल विनंती अर्ज करा.

76. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर 15 ते 20 ओळीत निबंधलेखन करा. 5

अ) माझे आजोबा

ब) माझा भारत महान

स) निरक्षरता.